शासकीय अधिकाऱ्यांचे/कर्मचाऱ्यांचे गोपनीय
अहवाल लिहिणे व जतन करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक:सीएफआर-१२०३/प्र.क्र.३४/१३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक ३० जून, २००३

वाचा : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सीएफआर-१२९५/
प्र.क्र.३६/९५/१३, दिनांक १ फेब्रुवारी, १९९६,
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सीएफआर-१२०१/
प्र.क्र. ७४/२००१/१३, दिनांक २७ मार्च, २००२

## शासन निर्णय

संदर्भाधीन दिनांक १ फेब्रुवारी, १९९६ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यासंबंधीच्या व संस्करण करण्यासंबंधीच्या विविध टप्प्यांवरील सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. यातील सूचना क्र. २७ मध्ये संस्करणाच्या वेळी जर ते अहवाल वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार काळजीपूर्वक व तपशिलवार लिहिलेले नाहीत असे आढळले तर ते अहवाल संबंधित प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकाऱ्यांकडे सुधारून लिहिण्यासाठी परत पाठवावेत अशा स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे सूचना क्र. ३३ मध्ये ५०/५५ वर्षाच्या पुनर्विलोकनाच्या व पदोन्नतीच्या पात्रतेपर्यंत जे शेरे येत नाहीत असे शेरे प्रतिकूल समजण्याची गरज नाही. तथापि, ते संबंधितांना लेखी कळविण्यात यावेत. जेणेकरून स्वत:च्या कामात सुधारणा करून पदोन्नतीसाठी/पुनर्विलोकनासाठी आवश्यक त्या पात्रतेपर्यंत त्यांना पोहोचता येईल अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र पदोन्नतीच्या पात्रतेपर्यंत जे शेरे येत नाहीत असे शेरे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना कळविले जात नाहीत असे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे पुन्हा सूचना देण्यात येत आहेत की, पुनर्विलोकन तसेच पदोन्नतीच्या पात्रतेपर्यंत जे शेरे येत नाहीत ते शेरे संबंधितांना विहित कालावधीत लेखी कळविण्यात यावेत. जेणेकरून अधिकारी/कर्मचाऱ्यास त्याच्या कामात सुधारणा करण्याची संधी प्राप्त होऊ शकेल.

२. संदर्भाधीन अनुक्रमांक २ येथे नमूद केलेल्या दिनांक २७मार्च,२००२ च्या शासन निर्णयान्वये प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकाऱ्यांनी प्रत्येक कर्मचारी/अधिकाऱ्याच्या संदर्भात कच्चे टिपण (Ephemeral Roll) ठेवावे. या टिपणातील नोंदीच्या आधारे गोपनीय अहवालात शेरे लिहिण्यात यावेत अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, गोपनीय अहवाल लिहिताना कच्चे टिपण ठेवले जात नाही. त्यामुळे अहवाल काळातील कर्मचाऱ्याच्या कामकाजाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले जात नाही असे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. "अत्युत्कृष्ट" शेरे नोंदविताना प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकाऱ्यांने कच्च्या टिपणावरून अत्युत्कृष्ट शेऱ्याच्या पुष्ठ्यर्थ वस्तुस्थितीदर्शक समर्थन गोपनीय अहवालात देणे आवश्यक आहे. सर्व विभागांनी/नियुक्ती अधिकाऱ्यांनी या सूचना पुन्हा त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संबंधित प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

३. पुनर्विलोकन अधिकाऱ्याने गोपनीय अहवाल पुनर्विलोकित केलेला नसतानाही संबंधित

कृ.मा.प.

अधिकारी/कर्मचाऱ्याला प्रतिवेदन अधिकाऱ्यानी नोंदविलेले अत्युंत्कृष्ट शेरे कळविले जातात असेही शासनाच्या निदर्शनास आले आहे. "अत्युत्कृष्ट" असे उच्च दर्जाचे शेरे गोपनीय अहवालात समाविष्ट केल्याने अधिकारी/कर्मचारी यास त्यायोगे निवडसूचीतील वरचढपणा किंवा आगाऊ वेतनवाढ अशासारखे लाभ अनुज्ञेय ठरतात. सबब पुनर्विलोकन अधिकाऱ्याने गोपनीय अहवाल पुनर्विलोकित करणे अत्यावश्यक आहे. गोपनीय अहवाल पुनर्विलोकित झाल्याशिवाय "अत्युत्कृष्ट" शेरे संबंधितांना कळविण्यात येऊ नयेत.

४. सर्व विभागांनी /नियुक्ती अधिकाऱ्यांनी या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
11 अगस्त AUG 2003
शाखा
ब. लि. नि. व. जि. जिल्हाधिकारी

प्रकाश लोखंडे

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री/राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,